# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**३४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि२८.०६.२०२२**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०६/२०२२ ते २७/०६/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०६/२०२२ ते ०३/०७/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| ३.८ | ८.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ३.८ | पाऊस (मिमी) | १५ | ९ | १५ | २० | १७ |
| ३०.० | ३७.० | ३६.० | ३६.० | ३४.५ | ३५.५ | ३०.० | कमाल तापमान (अंसे.) | ३४ | ३५ | ३३ | ३२ | ३२ |
| २१.२ | २१.२ | २३.७ | २२.७ | २०.८ | २२.७ | २१.२ | किमान तापमान (अंसे.) | २५ | २६ | २५ | २४ | २३ |
| १.० | २.० | २.० | २.० | २.० | २.० | १.० | ढग स्थिती (आकाश) | ६ | ५ | ७ | ८ | ८ |
| ६५.० | ७०.० | ८३.० | ७७.० | ८२.० | ६५.० | ६५.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७४ | ८५ | ८० | ८० |
| ०.० | ४४.० | ४६.० | ४७.० | ५२.० | ४०.० | ०.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ६० | ६५ | ६५ | ६५ |
| ३.९ | ३.८ | ४.६ | ३.० | ३.९ | ४.१ | ३.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २७ | २७ | २७ | २७ | २४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | मागील आठवड्यात जिल्ह्यात बर्यानच ठिकाणी पाऊस झालेला आहे. त्यामुळे जमिनीतील ओल लक्षात घेऊन वाफसा आल्यास पेरणी करावी. |
| कापूस | पेरणी पूर्व तयारी | रस शोषणार्याप किडींच्या नियंत्रणासाठी कपाशीभोवती एक मीटर अंतरावर मका व चवळीची एक आड एक लागवड करावी. तसेच कपाशीच्या प्रत्येक ९ व्या ओळीच्या दुसर्याच बाजूस मका , चवळी व चारा या पिकंची लागवड करावी. |
| डाळिंब | | सूत्रकृमींच्या व्यवस्थापनासाठी झाडाभोवती झेंडूची लागवड केल्यास सूत्रकृमींचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| पशुधन व्यवस्थापन | | सध्याच्या ढगाळ व दमट वातावरणात बाह्य परोपजीवी उदा. माशा , पिसवा, डास यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी पशुवैद्यकांच्या सल्ल्याने बुटॉक्स , इक्टोमिन या औषधांची जनावरांच्या अंगावर तसेच गोठ्यात फवारणी करावी. गोठ्यामध्ये संध्याकाळच्या वेळी कडूनिंब , सिताफळ यांसारख्या पाल्याची धुरी करावी. काही भागात मान्सूनपूर्व पावसामुळे गवताची उगवन झाली आहे. असे कोवळे गवत जनावरे जास्त प्रमाणात खाणार नाहीत याची काळजी घ्यावी. शेळया मेंढयांमध्ये रोग प्रतिबंधक लसीकरण केले नसल्यास तातडीने लसीकरण करून घ्यावे. पावसाचा अंदाज घेऊन जनावरांसाठी योग्य निवारा करावा. विशेषत: शेळ्या मेंढ्यांबाबत त्या पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. शेळ्या मेंढ्या माजावर येत असल्याने त्यांच्या खाद्यात वाढ करावी. गोठा कोरडा राहावा यासाठी गोठ्यात चुना भुरभुरावा. |
| सोयाबीन | पेरणी पूर्व तयारी | पेरणी करीता खालील उपलब्ध वाणाची निवड करावी.<br>**वाणांची निवड:** जे एस-३३५, एम ए सी एस-११८८, फुले कल्याणी (डी एस-२२८), जे एस-९३०५, के एस-१०३, फुले अग्रणी, (केडीएस ३४४) आणि फुले संगम (केडीएस ७२६) |
| तूर | पेरणी पूर्व तयारी | पेरणी करीता खालील उपलब्ध वाणाची निवड करावी.<br>**वाणांची निवड:** विपुला, फुले राजेश्वरी, बी एस एम आर-८५३, बी एस एम आर-७३६, बी डी एन-७११, बी डी एन-७१६, पी के व्ही तारा |
| मका | पेरणी पूर्व तयारी | पेरणी करीता खालील उपलब्ध वाणाची निवड करावी.<br>**वाणांची निवड:** संगम, कुबेर, राजर्षी, फुले महर्षी, पूण संकर मका १ |
| भुईमुग | पेरणी पूर्व तयारी | पेरणी करीता खालील उपलब्ध वाणाची निवड करावी.<br>**वाणांची निवड:** एस बी-११, जे एल-२४ (फुले प्रगती), टी अे जी-२४, टी पी जी-४१, टी जी-२६, जे एल-५०१, फुले आर एच आर जी-६०२१, फुले उन्नती, जे एल-७७६ (फुले भारती), जे एल-१०८५ (फुले धनी) |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **बाजरी** | **पेरणी पूर्व तयारी** | पेरणी करीता खालील उपलब्ध वाणाची निवड करावी.<br>**वाणांची निवड: अ) संकरीत:** फुले आदिशक्ती, फुले महाशक्ती **ब) सुधारित:** धनशक्ती |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २८.०६.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**